महाराष्ट्र शासन
(गृह विभाग)
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ यांचे कार्यालय
कल्याण प.-४२१३०१
Email ID: cp.thane.dcpzone3@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्र:०२५१/२३१३४१३

दि.०५/०५/२०२६

प्रेस नोट

पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ३, कल्याण अंमली विरोधी पथकाची विशेष कारवाई एकुण ०३ आरोपींताकडून एकुण २१ लाख ४० हजार रूपये किंमतीचा १०७ किलो ''गांजा'' अंमली पदार्थ जप्त

दिनांक ०४/०५/२०२६ रोजी पोलीस उप आयुक्त परि. ०३, कल्याण यांचे आदेशान्वये अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथकातील सपोनि/अनिल गायकवाड, ग्रेड पोलीस उप निरीक्षक/जितेंद्र ठोके, पो. हवा./८०९० देवरे,पो.शि/७६५३ राहुल शिंदे,पो.शि./२३२३ अमित शिंदे,पोशि/२७६३ बिरपन, पोशि/२२२५४ खांडेकर व पो.शि/२९६४ खरसाण असे खडकपाडा पोलीस ठाणे हद्दीत बेकायदेशीर अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणारे,डिलर व अभिलेखावरील पाहिजे/फरारी आरोपीतांचा शोध घेवुन त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे अनुषंगाने गस्ती करीता रवाना झाले होते.

गस्ती दरम्यान वरील पोलीस पथक असे दि.०४/०५/२०२६ रोजी १४.०५ वा चे सुमारास वाडेघर, डम्पिंग ग्राउंडजवळ,सावर्जनिक रोडचे कडेला,कल्याण प. या ठिकाणी आले असता पथकास सार्वजनिक रोडचे कडेला तीन इसम असे हातवारे करून आपसात चर्चा करत संशयितरित्या आढळुन आले. त्यांचेकडे हिरव्या व पांढऱ्या रंगाचे गोण्या आढळुन आल्याने पथकाचा त्यांचेवर संशय बळावला. म्हणुन सदर तिन्ही इसमांकडे विचारपुस करण्याचे उद्देशाने त्यांचेजवळ जात असताना ते पळुन जाण्याचा प्रयत्न करू लागले म्हणुन त्यांना पळुन जाण्यास वाव न देता त्यांना जागीच दिनांक ०४/०५/२०२६ रोजी ताब्यात घेतले. सदर इसमांची नावे व पत्ता खालील प्रमाणे आहे.

१) वसिम नुरूजमा खान उर्फ पिला वय ३६ वर्षे रा.बिलालनगर,शांतीनगर भिंवडी

२) दिनेशकुमार सजीवर सरोज, वय.३० वर्षे रा.रूम नं.२ मार्कंड यादर चाळ,लुईसवाडी,वागळे इस्टेट ठाणे पश्चिम

३) मोहित मेवालाल वर्मा, वय.२७ वर्षे रा.शिवशक्ती बिल्डींग,एलव्हीएस रोड, मुंलूंड पश्चिम,मुंबई

सदर इसमांची पंचांसमक्ष अंगझडती घेता त्यात खालीलप्रमाणे वर्णनाचा मुद्देमाल मिळुन आला.

१	२१,४०,०००/-रू	किंमतीचा १०७ किलो ५० ग्रॅम वजनाचा 'गांजा'हा अंमली पदार्थ
२	१०,५००/- रू	रोख रक्कम
३	४१,०००/- रू	३ मोबाईल फोन
एकुण २१,९१,५००/- रूपये		

येणेप्रमाणे वर्णनाचा व किंमतीचा मुद्देमाल पंचनाम्यांतर्गत जप्त करून सदर इसमांविरुध्द पथकातील पो.शि./आकाश बिरपन यांनी दिलेल्या फिर्यादीवरून खडकपाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. ॥ २१३/२०२६ एन.डी.पी.एस कायदा कलम ८(क), २०(ब)(ii)(क), २९ प्रमाणे दिनांक ०४/०५/२०२६ रोजी गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली आहे. नमुद आरोपींना मा.न्यायालय समक्ष हजर करण्यात आले असता त्यांना दि. ०९/०५/२०२६ पावेतो पोलीस कोठडी सुनावली आहे.

<u>गुन्हे अभिलेख</u>

<u>१)वसीम नूरजमा खान, वय ३६ वर्ष रा.बिलालनगर,बिलाल चाळ,बिलाल मज्जिद जवळ,शांतीनगर भिवंडी</u>

- गु.र.क्र.०९/२०२२ कलम ८(क),२०(क),२९ एन डी पी एस कायदा १९८५
  एकुण २.५ किलो चरस (घाटकोपर युनिट -७)

<u>२)दिनेश कुमार संजीवन सरोज, वय ३० वर्ष, रा.लुईसवाडी,मार्कंडे यादव चाळ, वागळे इस्टेट ठाणे पश्चिम</u>

- गू र क्र १७/२१ कलम ८(क)(२०),२९ एन डी पी एस कायदा १९८५
  एकुण १८२० किलो गांजा (घाटकोपर युनिट -७)

<u>३) मोहित मेवालाल वर्मा,वय २७ राह.एल व्ही एस रोड,निर्मल लाईफ स्टाईल जवळ, मॅरेथॉन मिलेनियर समोर, मुलुंड वेस्ट</u>

- मुलुंड पोलीस ठाणे CCTNS no 661/2023 US 8(C),22(B) NDPS Act

सदरची कामगिरी परिमंडळ ३ कल्याण विशेष कारवाई पथक व खडकपाडा पोलीस ठाणे यांनी संयुक्तपणे केली आहे. अशा प्रकारे परिमंडळ ३ कल्याण मध्ये अंमली पदार्थ विरूध्द कारवाई सुरु राहणार आहे.